# सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद नांदेड

रेल्वे स्टेशन रोड, शिवाजी पुतळा जवळ, नांदेड - ४३१६०२

dyceogadzpnanded@gmail.com दुरध्वनी : ०२४६२ - २३४६६८


जाक्र/जिपनां/साप्रवि/आस्था 2-ब/ ५४ / २०२६ दिनांक: ०५/०१/२०२६

प्रति,

१. मा.प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा.नांदेड
२. सर्व खाते प्रमुख,जिल्हा परिषद,नांदेड
३. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती,जिल्हा नांदेड
४. सर्व बाल विकास अधिकारी एकात्मीक बाल विकास सेवा योजना ,जिल्हा नांदेड.
५. सर्व गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, जिल्हा नांदेड (मार्फत सर्व जि.प.हा.)
६. सर्व उप विभागीय अभियंता, उप विभाग (बांधकाम/लघुपाटबंधारे/पाणी पुरवठा) जिल्हा परिषद,नांदेड
७. सर्व तालुका आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,नांदेड
८. सर्व वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केद्रं जिल्हा नांदेड (मार्फत ता.आ.अ)
९. सर्व मुख्याध्यापक ,जिल्हा परिषद हायस्कुल जिल्हा नांदेड (मार्फत गशिअ )

**विषय** :- जिल्हा सेवा वर्ग-३ सहायक प्रशासन अधिकारी / कनिष्ठ प्रशासन अधिकारी / वरिष्ठ सहाय्यक / कनिष्ठ सहाय्यक / लघु लेखक - लघु टंकलेखक या संवर्गाची दि.०१/०१/२०२६ रोजीची तात्पुरती सेवा ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ** : १. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही २०१६/ प्र.क्र.२८१/ कार्या-१२ दिनांक १३ जुलै २०२१.

२. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२४/ प्र.क्र.५०९/ आस्था-७ दि. २९/११/२०२४

३. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र.सेवाजे-२००८/प्र.क्र.३९/ आस्था-१० दिनांक ३१ मार्च २०१७.

४.मा.मु.का.अ.यांचे अधिकार प्रदान आदेश जा.क्र.जिपना/साप्रवि/आस्था-१/७ दि.३/११/२००७

उपरोक्त विषयान्वये संदर्भ क्र. ०१ च्या शासन परित्रकान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन), २०२१" ही दिनांक २१ जून २०२१ पासून अंमलात आली असल्याचे व सदर नियमावलीतील नियम ५ नुसार मागली कॅलेंडर वर्षामध्ये संबंधित संवर्गांत थेट नियुक्ती किंवा नियमित अथवा तात्पुरती पदोन्नतीने नियुक्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांची तात्पुरती ज्येष्ठतायादी तयार करून प्रसिध्द करणेबाबत निर्देश आहेत. तसेच संदर्भ क्र. ०२ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन), २०२१" जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येत असल्याचे नमूद करुन या नियमातील तरतूदी विचारात घेवून कार्यवाही करण्याचे निर्देश आहेत.

त्यानुसार संदर्भ क्र.०४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद नांदेड जिल्हा सेवा गट-क वर्ग-३ **सहायक प्रशासन अधिकारी / कनिष्ठ प्रशासन अधिकारी / वरिष्ठ सहाय्यक / कनिष्ठ सहायक/ लघूलेखक** - लघूटंकलेखक या संवर्गाच्या दिनांक ०१/०१/२०२६ रोजीच्या तात्पुरती सेवा ज्येष्ठात यादी प्रसिध्द करीत आहे.

सबब **सहायक प्रशासन अधिकारी / कनिष्ठ प्रशासन अधिकारी / वरिष्ठ सहाय्यक / कनिष्ठ सहायक/ लघूलेखक** - लघूटंकलेखक या संवर्गीच्या तात्पुरत्या सेवा ज्येष्ठता यादया यापत्रकासोबत प्रसिध्द करण्यात येत असुन सदर सेवा ज्येष्ठता यादया आपल्या अधिनस्त संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शणास आणुन त्यांची पोहोच घेण्यात यावी. तसेच दिनांक ०१/०१/२०२६ रोजीच्या तात्पुरती सेवा ज्येष्ठता यादीवर आणि दिनांक ०१/०१/२०२५ रोजीच्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादीवर संबंधित संवर्गातील कोण्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचे आक्षेप व हरकती असल्यास सदर यादी प्रसिध्दीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी. मुदतीनंतर आलेले आक्षेप व हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**सोबत :** प्राथमिक सेवा ज्येष्ठता यादी ०१/०१/२०२६

( राजकुमार मुक्कावार )
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)**
**जिल्हा परिषद नांदेड**